महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गात पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन आदेश क्रमांकः न्यायप्र-३०१८/प्र.क्र.४४२/सेवा-२

गो.ते.रुग्णालय इमारत संकुल,१० वा मजला,

मंत्रालय, मुंबई ४०० ००१.

तारीख: २० मार्च, २०१९

वाचा- १) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्र. बदली-२०१८/प्र.क्र.१८६/सेवा-२, दि. ३१.५.२०१८

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्र. विभाचौ-२०१८/प्र.क्र.७४/सेवा-४ दि. ०५.०२.२०१९

२) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे दि. ३.१०.२०१८, दि. ४.१.२०१९, दि. ३०.१.२०१९ व दि.१८.३.२०१९ रोजीचे आदेश

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००+ ग्रेड पे रु. ६६००) मधील जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील डॉ. संजीवकुमार मनोहरराव जाधव, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे यांची शासन आदेश दि. ३१.५.२०१८ अन्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, नागपूर या पदावर प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली होती. तथापि, सदर बदलीच्या ठिकाणी ते रुजू न झाल्याने त्यांना दि. २६.९.२०१८ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी डॉ. संजीवकुमार जाधव यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र. ९२६/२०१८ व बदलीच्या अनुषंगाने मुळ अर्ज क्र. ९७२/२०१८ दाखल केले होते. त्याप्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दि. ४.१.२०१९ रोजीच्या आदेशाव्दारे डॉ. संजीवकुमार जाधव यांचे दि. २६.९.२०१८ रोजीचे निलंबन आदेश रद्द ठरविले आहेत. त्यानुसार डॉ. संजीवकुमार जाधव यांचे दि. २६.९.२०१८ रोजीचे निलंबन आदेश दि. ५.२.२०१९ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आले असून, त्यांना पदस्थापना देण्यात आलेली नाही. डॉ. संजीवकुमार जाधव यांनी मा. न्यायाधिकरणात दाखल केलेल्या मुळ अर्ज क्र. ९७२/२०१८ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दि. १८.३.२०१९ रोजी डॉ. संजीवकुमार जाधव यांचे पदस्थापनेचे आदेश दहा दिवसात निर्गमित करण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार डॉ. संजीवकुमार मनोहरराव जाधव यांची सहायक संचालक, आरोग्य सेवा (आरोग्य शिक्षण केंद्र), पुणे या रिक्त पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

२. सदर आदेश महाराष्ट्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) आणि कलम ४(५) च्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१६१७०८१०९६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, serialNumber=9ab69d6945f8950a9525831f8ae9726be295d17576e78d19fa8f6cb952bb04a0, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2019.03.20 12:54:57 +05'30'

(वि.पुं.घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
३) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई
४) उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे
५) उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.),पुणे
६) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे
१०) सहायक संचालक, आरोग्य सेवा (आरोग्य शिक्षण केंद्र) पुणे
११) मा. मंत्री (आरोग्य) / मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
१२) प्रधान सचिव (आरोग्य व कु.क.) यांचे स्वीय सहाय्यक
१३) डॉ. संजीवकुमार मनोहरराव जाधव (व्दारा संचालक,आरोग्य सेवा, मुंबई यांचेमार्फत)
१४) निवडनस्ती (सेवा - २)